# श्रीसमर्थ शारदा सुगम संगीत संस्था

नोंदणी क्र. :- महा / २५५ / ०७ / ठाणे

द्वारा : सौ. सुनिता रानडे, दळवी अपार्टमेंट,दुधनाका, राममारुती चौक, कल्याण - ४२१३०१.

नोंदणीकृत कार्यालय : शॉप नं २, जगदंबा अपार्टमेंट, दुधनाका, राममारुती चौक, कल्याण - ४२१३०१.

फोन नं. :- २२०९११८, ९८६७९८२४९४, ९३२१०२८८४०

ॐ

कल्याण
दि. ०८/०४/२०१६
(गुढीपाडवा)

प्रति,

मा. संचालक / संचालिका

महोदय,

- **नवीन अभ्यासक्रम**
- **गीत मंच प्रदर्शन**

कळविण्यास आनंद होतो की, नवीन वर्षाच्या प्रथम दिवशी आपल्या संस्थेने एक नवीन अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. गुढीपाडव्याची, ही जणू काही नविन वर्षाची, सर्वांना एक छान भेट मिळाली, असे आपणास वाटेल ! नव्या अभ्यासक्रमांचे नांव आहे ***"गीत मंच प्रदर्शन"*** त्यामध्ये प्रथमा ते विशारद ४ परीक्षा समाविष्ट आहेत.

**<u>नव्या अभ्यासक्रम निर्मितीचे कारण / पार्श्वभूमी</u>**

गीत विशारद नंतर आपण "गीत अलंकार" च्या ४ परीक्षा ठेवल्या आहेत. त्यामध्ये पार्ट नं. १ ते ४ मध्ये १० गाण्यापासून सुरवात करून प्रतिवर्षी दोन दोन गाणी वाढत जातात व अन्य तपशील, अभ्यासक्रम पुस्तिका (रु. १५ मूल्य असलेली) पान क्र. ७ व ८ प्रमाणे आहे.

परीक्षा फी आकारताना आपण सर्वसाधारणपणे एका दिवसाच्या ८ तासांत परीक्षकांचा प्रवास खर्च, प्रवास भाडे, मानधन व प्रमाणपत्रे छपाई / लिखाण इ. खर्च समाविष्ट व्हावा अशा हेतूने प्रथम 'फी' आकारणी ठरवतो व पुढे अनुभवानुसार, गरजेनुसार त्यात बदल करतो.

गीत अलंकारचे जे अभ्यासक्रम सध्या सुरू आहेत, त्यामध्ये आपण पार्ट १ पासून साधारण अर्धा तास परीक्षेसाठी वेळ लागावा असे धरून 'फी' आकार ठरवला आहे. पुढील पार्टस् मध्ये वेळेनुसार फी वृध्दी आहे. यामध्ये "थिमबेसड" कार्यक्रम नसेल तर किमान ५ विविध गीत प्रकार गाण्याची अपेक्षा आहे.

परीक्षा घेताना आपण वेळेचे नियोजन हेतूमुळे एकच कडवे (अंतरा) गावा व सर्व गाणी वेळेत संपावी अशी अपेक्षा करतो व ती सर्व वेळ नियोजनानुसार व्यवहार्य व औचित्यपूर्ण ठेवण्याचा प्रयत्न करतो.

# श्रीसमर्थ शारदा सुगम संगीत संस्था

नोंदणी क्र. :- महा / २५५ / ०७ / ठाणे

द्वारा : सौ. सुनिता रानडे, दळवी अपार्टमेंट,दुधनाका, राममारुती चौक, कल्याण - ४२१३०१.
नोंदणीकृत कार्यालय : शॉप नं २, जगदंबा अपार्टमेंट, दुधनाका, राममारुती चौक, कल्याण - ४२१३०१.
फोन नं. :- २२०९११८, ९८६७९८२४१४, ९३२१०२८८४०




असे असले तरी काही प्राप्त सूचना नुसार असे कळले की संपूर्ण गाण्याचे समाधान मिळावे अशी अपेक्षा असणारेही साधक आहेत. तसे गीतांच्या संख्येच्या बंधनामुळे विस्ताराने एखादे गीत (अभंग, भक्तीगीत, गौळण, गजल) गाण्याची इच्छा असेल त्यावर मर्यादा येते. जसा एक गट या मताचा, अपेक्षांचा आहे. तसाच दुसरा साधकांचा मोठा गट सध्या सुरू आहे त्यावर संतुष्ट आहे.

सर्वांचा विचार करता अखेर अभ्यासक्रम समितीने सर्वांना पर्याय द्यावे म्हणून असे ठरविले की सध्या सुरू असलेले अभ्यासक्रम तसेच ठेऊन एक आणखी नवा अभ्यासक्रम तयार करून द्यावा, ज्यामुळे याचे वरील परीच्छेदांत असलेली अपेक्षाही पूर्ण होईल. गीत विशारद नंतरच्या परीक्षांतून अपेक्षा सादरीकरणाचीच आहे. त्यात फक्त गीतांची संख्या, गीतप्रकार व गायन काल याचेवरून अभ्यासक्रम व परीक्षा पध्दत ठरते. नव्या अभ्यासक्रमाला म्हणूनच **"गीत मंच प्रदर्शन"** असे नांव देऊन त्याचे प्रारंभिक, मध्यमा, उपांत्य विशारद व विशारद असे चार भाग केले आहे. प्रत्येक भाग हा वेळेनुसार १ तास, १।। तास, २ तास व २।। तास असा केला असून त्यामध्ये अनुक्रमे ५,७,१०,१२, किमान गीते असावी. कल्पनाधारीत (थिमबेसड) सादरीकरण नसेल तर भक्तीगीत, भावगीत, अभंग, भूपाळी, गौळण, गझल यापैकी किमान ५ गीत प्रकार विविधता अपेक्षित ठेवली आहे. प्रत्येक गीतासाठी वेळेची मर्यादा नाही. (अभंग, गझल, भक्तीगीत जास्त वेळ गाता येतात, अन्य गीत प्रकार भावगीत, भूपाळीला मर्यादा अधिक येते) मात्र सर्व प्रदर्शनाची निवेदनासहीत वेळ मर्यादा १ तास ते परीक्षानुसार २।। तास पर्यंत आहे. गीतांची यादी, निवेदन व गायनांचे मार्क वगैरे तपशील (गीत अलंकार नुसार आहे.) सदर विषयी फी वगैरे संक्षिप्त तपशील सोबत जोडला आहे. सदर अभ्यासक्रमाचा लाभ हा १ जून २०१६ पासून होणाऱ्या परीक्षांना लागू केला आहे.

नवीन अभ्यासक्रमामुळे सर्व संचालकांना आनंद होईल असे वाटते. नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

आपली विश्वासू,

**सौ. शिवाली पारेकर**
कार्याध्यक्षा

**सौ. स्वाती पटवर्धन**
कार्यवाह

ॐ

## गीतमंच प्रदर्शन परीक्षा

सदर परीक्षाद्वारा सादरीकरण व त्यांचे गुणांकन (ग्रेड OS, A, B, C प्रमाणे) अपेक्षित आहे. गीत संख्या, वेळ मर्यादा, फी खालीलप्रमाणे

| परीक्षेचे नांव | किमान गीत संख्या | कमाल वेळ मर्यादा | संस्थेस परीक्षा देय फी रु. |
|---|---|---|---|
| गीत मंच प्रदर्शन प्रारंभिक | ५ | ६० मि. | रु. ५००/- |
| गीत मंच प्रदर्शन - मध्यमा | ७ | ९० मि. | रु. ७५०/- |
| गीत मंच प्रदर्शन उपांत्य विशारद | १० | १२० मि. | रु. १५००/- |
| गीत मंच विशारद | १२ | १५० मि. | रु. २०००/- |

कल्पनाधारीत (थीमबेसड्) सादरीकरणात गीत प्रकाराचे बंधन नाही. अन्यथा १ भक्तीगीत, १ अभंग, १ भूपाळी, १ गौळण / गजल अशी विविधता हवी.